Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

**B**

# Paper-II
# ECONOMICS

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) .........................................

(Name) .................................................

2. (Signature) .........................................

(Name) .................................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ..............................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

## APR - 11217

**Time Allowed : 1¼ Hours]** **[Maximum Marks : 100**

Number of Pages in this Booklet : **24** Number of Questions in this Booklet : **50**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **50** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-II will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/ questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 50 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

# Economics
## Paper II
## अर्थशास्त्र
## प्रश्नपत्रिका II

**Time Allowed : 75 Minutes]** **[Maximum Marks : 100**

**Note :** This paper contains **Fifty (50)** multiple choice questions, each question carrying **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पन्नास (50)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. "Underdevelped countries are the slums of the world economy." This statement is stated by .................. .
   (A) Ragner Nurkse
   (B) A. K. Cairncross
   (C) Colin Clark
   (D) Jadgish Bhagwati

2. Marginal damages ..................... .
   (A) must always be considered in social marginal cost
   (B) must not be considered in social marginal cost
   (C) have nothing to do with social marginal cost
   (D) Are not part of social loss

1. ''न्यूनविकसित राष्ट्रे ही जागतिक अर्थव्यवस्थेच्या झोपडपट्ट्या आहेत.'' हे विधान ................ यांनी नमूद केले आहे.
   (A) रॅगनर नर्क्स
   (B) ए. के. केअर्नक्रॉस
   (C) कोलीन क्लार्क
   (D) जगदीश भगवती

2. सिमांत नुकसानीचा विचार .................... .
   (A) सामाजिक सिमांत खर्चात नेहमी केलाच पाहिजे
   (B) सामाजिक सिमांत खर्चात करण्याची आवश्यकता नाही
   (C) सामाजिक सिमांत खर्चाशी संबंधित नाही
   (D) हा सामाजिक नुकसानाचा भाग नाही

3. Which of the following is *correct* ?
   (A) Traditional budgeting focuses only on goals
   (B) Zero based budgeting produces a single level of appropriation for an activity
   (C) Traditional budget starts with last year's funding appropriation
   (D) Zero based budgeting does not consider alternatives

4. In the context of Government of India budgets, which type of deficit is suggested by the formula : Total Receipts—Total expenditure :
   (A) Revenue deficit
   (B) Primary deficit
   (C) Budget deficit
   (D) Fiscal deficit

5. Which one of the following statements is *not* laid before Parliament under F.R.B.M. Act, 2003 ?
   (A) Macro-economic Framework Statement
   (B) Medium Term Fiscal Policy Statement
   (C) Annual Financial Statement
   (D) Fiscal Policy Strategy Statement

3. खालीलपैकी कोणते विधान **बरोबर** आहे ?
   (A) परंपरागत अंदाजपत्रकीय पद्धतीत फक्त उद्देशांचा विचार केला जातो
   (B) शून्याधारित अंदाजपत्रकातून एका उपक्रमासाठी एकाच पातळीवरून विनियोजन केले जाते
   (C) परंपरागत अंदाजपत्रक मागील वर्षाच्या विनियोजनावरून केले जाते
   (D) शून्याधारित अंदाजपत्रकात पर्यायांचा विचार केला जात नाही

4. भारताच्या अर्थसंकल्पनामध्ये एकूण महसूल–एकूण खर्च या सूत्रानुसार कोणती तूट सूचविली जाते ?
   (A) महसूली तूट
   (B) प्राथमिक तूट
   (C) अंदाजपत्रकीय तूट
   (D) राजकोषीय तूट

5. 2003 च्या राजकोषीय जबाबदारी आणि अर्थ-संकल्पीय व्यवस्थापन कायद्यांतर्गत खालीलपैकी कोणते विवरण पत्र लोकसभेत मांडले जात **नाही** ?
   (A) समग्रलक्ष्यी आर्थिक आराखडा विवरणपत्र
   (B) मध्यममुदती राजकोषीय धोरण विवरणपत्र
   (C) वार्षिक वित्तीय विवरणपत्र
   (D) राजकोषीय धोरण व्यूहरचना विवरणपत्र

6. Imports are taxed but exports are not taxed under :

(A) Residence principle

(B) Origin principle

(C) Destination principle

(D) Source principle

6. कोणत्या तत्त्वाआधारे निर्यातीवर कर न आकारता आयातीवर कर आकारला जातो ?

(A) निवासस्थान तत्त्व

(B) आरंभस्थान तत्त्व

(C) गंतव्यस्थान तत्त्व

(D) स्रोतस्थान तत्त्व

7. According to the budget estimate of 2015-16, the external debt of Government of India was about .......................... of the total public debt.

(A) 1.5%

(B) 2.3%

(C) 3.7%

(D) 4.5%

7. अर्थसंकल्प 2015–16 च्या अंदाजानुसार एकूण सार्वजनिक कर्जाच्या भारताचे विदेशी कर्ज जवळपास .................. होते.

(A) 1.5 टक्के

(B) 2.3 टक्के

(C) 3.7 टक्के

(D) 4.5 टक्के

8. According to the recommendations of the 12th, 13th and 14th Finance Commissions in India, the percentage share of states in the total central tax revenue was ...................... respectively.

(A) 30.5%, 32% and 42%

(B) 29.5%, 32% and 42%

(C) 27.5%, 30.5% and 32%

(D) 30.5%, 32% and 45%

8. भारतात 12व्या, 13व्या आणि 14व्या वित्त–आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र सरकारच्या एकूण महसूलातील राज्यांचा हिस्सा अनुक्रमे ..................... होता.

(A) 30.5%, 32% आणि 42%

(B) 29.5%, 32% आणि 42%

(C) 27.5%, 30.5% आणि 32%

(D) 30.5%, 32% आणि 45%

9. Which of the following is an exception to Linder's Spillover Theory ?
   (A) India Exporting Ganesh Idols
   (B) China Exporting Ganesh Idols
   (C) US Exporting Chrismas Trees
   (D) Scotland Exporting Alcohol

9. खालीलपैकी कोणता लिंडरच्या सांडवण सिद्धान्तास अपवाद आहे ?
   (A) भारत करीत असलेली गणेश मूर्तींची निर्यात
   (B) चीन करीत असलेली गणेश मूर्तींची निर्यात
   (C) अमेरिका करीत असलेली ख्रिसमस ट्री ची निर्यात
   (D) स्कॉटलंड करीत असलेली मद्याची निर्यात

10. Which of the following terms of trade concept attempts to capture productivity in the export sector and import competing sector of a country ?
   (A) Double factoral terms of trade
   (B) Gross Barter terms of trade
   (C) Net Barter terms of trade
   (D) Income terms of trade

10. व्यापारशर्तींची खालीलपैकी कोणती संकल्पना एखाद्या देशातील निर्यात क्षेत्र आणि आयात स्पर्धक क्षेत्राची उत्पादकता लक्षात घेते ?
   (A) द्विघटक व्यापारशर्ती
   (B) सकल वस्तुविनिमय व्यापारशर्ती
   (C) निव्वळ वस्तुविनिमय व्यापारशर्ती
   (D) उत्पन्न व्यापारशर्ती

11. When exchange rate changes from \$1 = Rs. 65.22 to \$1 = Rs. 67.27 due to market forces, it is called as :
   (A) Devaluation of Rupee
   (B) Revaluation of Rupee
   (C) Upvaluation of Rupee
   (D) Depreciation of Rupee

11. जेव्हा विनिमय दर \$1 = ₹ 65.22 वरून \$1 = ₹ 67.27 असा बाजार यंत्रणेमुळे बदलतो तेव्हा त्यास .................... असे म्हणतात.
   (A) रुपयाचे अवमूल्यन
   (B) रुपयाचे पुनर्मूल्यन
   (C) रुपयाचे ऊर्ध्वमूल्यन
   (D) रुपयाचा मूल्य-ह्रास

12. Match the following :

'A'

(*a*) Product Cycle Hypothesis

(*b*) Spillover Theory

(*c*) Availability Theory

(*d*) Price-Specie Flow Mechanism

'B'

(*i*) David Hume

(*ii*) Vernon

(*iii*) Linder

(*iv*) Kravis

*Codes* :

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) | (*i*) |
| (B) | (*ii*) | (*i*) | (*iv*) | (*iii*) |
| (C) | (*iii*) | (*i*) | (*iv*) | (*ii*) |
| (D) | (*iv*) | (*iii*) | (*i*) | (*ii*) |

13. **Statement I :**

According to Adam Smith International Trade takes place on the basis of comparative advantage.

**Statement II :**

The principle of absolute advantage is at the focal point of David Ricardo's theory of International Trade.

(A) Statement (I) is incorrect and statement (II) is correct

(B) Statement (I) is correct and statement (II) is incorrect

(C) Both the statements (I) and (II) are correct

(D) Both the statements (I) and (II) are incorrect

12. जोड्या जुळवा :

'A'

(*a*) वस्तू चक्र परिकल्पना

(*b*) सांडवण सिद्धान्त

(*c*) उपलब्धता सिद्धान्त

(*d*) किंमत-मौलिक धातू प्रवाह यंत्रणा

'B'

(*i*) डेव्हिड ह्यूम

(*ii*) व्हेरनॉन

(*iii*) लिंडर

(*iv*) क्राविस

**सांकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) | (*i*) |
| (B) | (*ii*) | (*i*) | (*iv*) | (*iii*) |
| (C) | (*iii*) | (*i*) | (*iv*) | (*ii*) |
| (D) | (*iv*) | (*iii*) | (*i*) | (*ii*) |

13. **विधान I :**

ॲडम स्मिथच्या मते आंतरराष्ट्रीय व्यापार तौलनिक लाभावर आधारित असतो.

**विधान II :**

केवल लाभाचे तत्त्व डेव्हिड रिकार्डोच्या आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धान्ताच्या केंद्रस्थानी आहे.

(A) विधान (I) चूक आहे आणि विधान (II) बरोबर आहे

(B) विधान (I) बरोबर आहे आणि विधान (II) चूक आहे

(C) विधान (I) आणि विधान (II) दोन्ही बरोबर आहेत

(D) विधान (I) आणि विधान (II) दोन्ही चूक आहेत

14. One limitation of absorption approach to Balance of Payments adjustment is :
   (A) It assumes a constant income
   (B) It assumes a constant terms of trade
   (C) It assumes a constant aggregate expenditure
   (D) It assumes nominal devaluation of currency

15. According to Vernon, which is the source of comparative advantage for developing countries ?
   (A) Cheap labour combined with imported capital
   (B) Imported capital combined with innovation
   (C) Innovation combined with cheap labour
   (D) Cheap labour combined with high technology adopted through imitation

14. व्यवहारतोलाच्या अवशोषण दृष्टिकोनाची एक मर्यादा म्हणजे त्यात ………………, हे होय.
   (A) स्थिर उत्पन्न गृहित धरले आहे
   (B) व्यापारशर्ती स्थिर असल्याचे गृहित धरले आहे
   (C) स्थिर एकूण खर्च गृहित धरला आहे
   (D) त्यात चलनाचे नाममात्र अवमूल्यन गृहित धरले आहे

15. व्हेरनॉनच्या मते विकसनशील देशांसाठी तौलनिक लाभाचा स्रोत कोणता असतो ?
   (A) आयात भांडवलासह स्वस्त श्रम
   (B) नवप्रवर्तनासह आयात भांडवल
   (C) स्वस्त श्रमासह नवप्रवर्तन
   (D) अनुकरणाच्या माध्यमातून स्वीकारलेल्या उच्च तंत्रज्ञानासह स्वस्त श्रम

16. The working of Indian monetary system was studied by .................. .

(A) Urjit Patel Committee, 2010

(B) R. Gandhi Committee, 2005

(C) Chakravorty Committee, 1985

(D) Narsimham Committee, 1980

17. SAFTA stands for ...................... .

(A) South Asian Foreign Trade Association

(B) South Asian Free Trade Association

(C) South African Free Trade Association

(D) South Asian Financial Transaction Association

18. Annual percentage growth rate of India's GDP in July 2014, July 2015 and July 2016 was ............, ........... and ................ respectively.

(A) 7.1, 7.5 and 6.7

(B) 6.7, 7.1 and 7.5

(C) 6.7, 7.5 and 7.1

(D) 7.5, 7.1 and 6.7

16. भारतातील चलन व्यवस्थेच्या कामकाजाचा .................... अभ्यास केला.

(A) उर्जित पटेल समिती, 2010

(B) आर. गांधी समिती, 2005

(C) चक्रवर्ती समिती, 1985

(D) नरसिंहम समिती, 1980

17. 'SAFTA' खालीलपैकी काय दर्शविते ?

(A) साउथ एसिअन फॉरीन ट्रेड असोसीएशन

(B) साउथ एसिअन फ्री ट्रेड असोसीएशन

(C) साउथ अफ्रिकन फ्री ट्रेड असोसीएशन

(D) साउथ एसियन फायनान्सीअल ट्रांझेक्शन असोसीएशन

18. भारताच्या GDP मधील आर्थिक वृद्धीदर जुलै 2014, जुलै 2015 आणि जुलै 2016 मध्ये अनुक्रमे ............, ........ आणि .............. होती.

(A) 7.1, 7.5 आणि 6.7

(B) 6.7, 7.1 आणि 7.5

(C) 6.7, 7.5 आणि 7.1

(D) 7.5, 7.1 आणि 6.7

19. Which one of the following statements is correct with respect to India's Foreign Trade Policy 2015-20 ?

(I) Export target set for 2019-20 at US and 900 billion

(II) India's share in world export to be raised from 2 percent to 3.5 percent

(III) Foreign Trade Policy to be alligned to make in India, Digital India and Skill India

(IV) Foreign Trade Policy will be reviewed annually

(A) (I), (II) and (III) are correct

(B) (II), (III) and (IV) are correct

(C) (I), (III) and (IV) are correct

(D) (I), (II) and (IV) are correct

19. खालीलपैकी कोणते एक विधान भारताच्या विदेशी व्यापार धोरण 2015-20 च्या संदर्भात अचूक आहे ?

(I) वर्ष 2019-20 करिता निर्यातीचे लक्ष्य 900 बिलियन अमेरिकन डॉलर निश्चित केले आहे

(II) भारताचा जागतिक निर्यातीतील हिस्सा 2 टक्के वरून 3.5 टक्के पर्यंत वाढविणे

(III) विदेशी व्यापार धोरण मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया आणि स्किल इंडिया यांना जोडणे

(IV) विदेशी व्यापार धोरणाचा वार्षिक आढावा घेणे

(A) (I), (II) आणि (III) अचूक आहेत

(B) (II), (III) आणि (IV) अचूक आहेत

(C) (I), (III) आणि (IV) अचूक आहेत

(D) (I), (II) आणि (IV) अचूक आहेत

20. FRBM is the abbreviation of :

(A) Fiscal Responsibility and Budget Management

(B) Fiscal Regulation and Budget Management

(C) Fiscal Revaluation and Budget Management

(D) Fiscal Representation and Budget Management

21. Which of the following is *not* the member of G-7 group of countries ?

(*i*) USA

(*ii*) Russia

(*iii*) France

(*iv*) Japan

(A) (*ii*)

(B) (*i*)

(C) (*iv*)

(D) (*iii*)

20. FRBM चे पूर्ण रूप काय ?

(A) फिस्कल रिस्पॉन्सिबिलिटी अँड बजेट मॅनेजमेंट

(B) फिस्कल रेग्युलेशन अँड बजेट मॅनेजमेंट

(C) फिस्कल रिव्हॅल्युएशन अँड बजेट मॅनेजमेंट

(D) फिस्कल रिप्रेसेंटेशन अँड बजेट मॅनेजमेंट

21. खालीलपैकी कोणता देश G-7 समूहाचा सभासद **नाही** ?

(*i*) अमेरिका

(*ii*) रशिया

(*iii*) फ्रान्स

(*iv*) जपान

(A) (*ii*)

(B) (*i*)

(C) (*iv*)

(D) (*iii*)

22. Nobel Prize in Economics for the year 2016 has been given to Oliver Hart and Bengt Holmstrom for their contribution to .................. .
   (A) Imperfect competition
   (B) Contract theory
   (C) Limits of state intervention under market economy
   (D) New horizon of game theory

23. Micro Units Development and Refinance Agency (MUDRA) Bank was launched by Prime Minister on .................... .
   (A) 8th April, 2015
   (B) 14th April, 2015
   (C) 2nd October, 2015
   (D) 14th November, 2015

24. In descriptive statistics, we study :
   (A) The description of decision making process
   (B) The methods of organising, displaying and describing data
   (C) How to describe the probability distribution
   (D) Research planning

22. 2016 या वर्षी अर्थशास्त्राचे नोबल पारितोषिक ॲलिव्हर हार्ट आणि बेंट होल्मस्ट्रॉम यांना त्यांच्या .................... योगदानाबद्दले दिले गेले.
   (A) अपूर्ण स्पर्धा
   (B) करार सिद्धान्त
   (C) बाजारप्रणीत अर्थव्यवस्थेत शासकीय हस्तक्षेपाची मर्यादा
   (D) खेळ सिद्धान्ताची नवी क्षितिजे

23. सुक्ष्म प्रघटके विकास व पुनर्वित्त अभिकरण (मुद्रा) बँक पंतप्रधानाचे हस्ते ................या दिवशी सुरू झाली.
   (A) 8 एप्रील, 2015
   (B) 14 एप्रील, 2015
   (C) 2 ऑक्टोबर, 2015
   (D) 14 नोव्हेंबर, 2015

24. वर्णनात्मक सांख्यिकीमध्ये आपण खालीलपैकी कोणत्या बाबीचा अभ्यास करतो ?
   (A) निर्णयन प्रक्रियेचे वर्णन
   (B) समंक संघटित, प्रदर्शित आणि वर्णन करण्यासाठी अवलंबिण्यात येणारी पद्धत
   (C) संभाव्यता वितरण कशाप्रकारे वर्णवावे
   (D) संशोधन नियोजन

25. Base year quantities weights are used in :

(A) Laspeyre's method

(B) Paasche's method

(C) Fisher's ideal method

(D) Consumers' index

25. आधार वर्ष भारीत परिमाणे खालीलपैकी कोणत्या पद्धतीत उपयोगात आणण्यात येते ?

(A) लासपेअर्स पद्धत

(B) पाश्चेज पद्धत

(C) फिशरची आदर्श पद्धत

(D) ग्राहक निर्देशांक

26. The overall goodness of fit of the regression model is measured by ..................... .

(A) Coefficient of variation

(B) Coefficient of determination

(C) Coefficient of correlation

(D) Coefficient of association

26. समाश्रयण प्रतिमानाची अन्वायोजन समर्पकता (goodness of fit) .................. ने मोजली जाते.

(A) विचरण गुणांक

(B) निर्धारण गुणांक

(C) सहसंबंध गुणांक

(D) साहचर्य गुणांक

27. If "time" is used as the independent variable in a simple linear regression model, then which of the following assumptions could be violated ?

(A) There is a linear relationship between the independent and dependent variables

(B) The residual variation is the same for all fitted values of Y

(C) The residuals are normally distributed

(D) Successive observations of the dependent variable are uncorrelated

27. साध्या रेषीय प्रतिपगमन प्रतिमानात 'काळ' हा स्वतंत्र चल उपयोगात आणल्यास खालीलपैकी कोणते गृहित भंग होण्याची शक्यता आहे ?

(A) स्वतंत्र आणि अवलंबित चले यातील संबंध रेषीय आहे

(B) अवशिष्ट विचरण Y च्या सर्व अन्वायोजित मूल्यांसाठी समान आहे

(C) अवशिष्टाचे वितरण प्रसामान्य स्वरूपाचे

(D) अवलंबित चलांचे उत्तरोत्तर निरीक्षणे सहसंबंधित नाही

28. Index numbers are expressed in :

(A) Ratios

(B) Squares

(C) Percentages

(D) Combination

29. Which of the following is *not* based on all the observations ?

(A) Arithmetic Mean (AM)

(B) Geometric Mean (GM)

(C) Harmonic Mean (HM)

(D) Mode

30. If all the values are of equal importance, the index numbers are called :

(A) Weighted

(B) Unweighted

(C) Composite

(D) Value Index

28. निर्देशांक खालीलपैकी कशाच्या द्वारे सुव्यक्त करण्यात येतात ?

(A) प्रमाण

(B) वर्ग

(C) टक्केवारी

(D) संयुक्तीकरण

29. खालीलपैकी कोणते मापन सर्वच निरीक्षणांच्या आधारे करण्यात येत **नाही** ?

(A) गणितीय मध्य

(B) भूमितीय मध्य

(C) संवादी मध्य

(D) बहुलेख

30. सर्वच मूल्यांना समान महत्त्व देण्यात आल्यास निर्देशांकाला पुढीलपैकी काय म्हणतात ?

(A) भारित

(B) अभारित

(C) संमिश्र

(D) मूल्य निर्देशांक

31. Rationality principle of revealed preference indicates .................... .
   (A) Maximization of satisfaction and preference to bigger over smaller bundle of goods
   (B) Maximization of satisfaction with the same bundle of goods
   (C) Maximisation of satisfaction despite a decline in the size of bundle of goods
   (D) Maximisation of satisfaction and preference to smaller over bigger bundle of goods

32. Match the following :

'A'

(*a*) Kinked demand curve
(*b*) Isoquant
(*c*) Shift in demand
(*d*) Upward sloping supply curve

'B'

(*i*) Change in income
(*ii*) Increasing marginal cost
(*iii*) Quantity rigidity
(*iv*) Convexity and non-intersection

*Codes* :

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*iii*) | (*iv*) | (*ii*) | (*i*) |
| (B) | (*ii*) | (*i*) | (*iv*) | (*iii*) |
| (C) | (*iv*) | (*iii*) | (*ii*) | (*i*) |
| (D) | (*iii*) | (*iv*) | (*i*) | (*ii*) |

31. प्रकटपसंतीचे विवेकी तत्त्व हे ................ याकडे अंगुलिनिर्देश करते.
   (A) समाधानाचे महत्तमीकरण आणि न्यूनतम-ऐवजी अधिक वस्तू समूहास प्राधान्य
   (B) समाधानाचे महत्तमीकरण आणि त्याच वस्तू समूहास प्राधान्य
   (C) वस्तुसमूहातील घटिव्यतिरिक्तही समाधानाचे महत्तमीकरण
   (D) समाधानाचे महत्तमीकरण आणि अधिक-ऐवजी न्यूनतम वस्तू समूहास प्राधान्य

32. जोड्या जुळवा :

'A'

(*a*) बाकदार मागणी वक्र
(*b*) समोत्पादन वक्र
(*c*) मागणीचे स्थलांतर
(*d*) उर्ध्वगामी पुरवठा वक्र

'B'

(*i*) उत्पन्नात बदल
(*ii*) वाढता सिमांत खर्च
(*iii*) नगसंख्या परिदृढता
(*iv*) अंतरवक्रता आणि अछेदनता

**सांकेतांक** :

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*iii*) | (*iv*) | (*ii*) | (*i*) |
| (B) | (*ii*) | (*i*) | (*iv*) | (*iii*) |
| (C) | (*iv*) | (*iii*) | (*ii*) | (*i*) |
| (D) | (*iii*) | (*iv*) | (*i*) | (*ii*) |

33. What can you say about an indifference curve that is positively sloping ?
   (A) Both the commodities are wanted commodities
   (B) One commodity is wanted and the other is unwanted
   (C) One of the commodities is neutral
   (D) Both the commodities are unwanted commodities

34. If the commodities are perfect complements of each other, the corresponding indifference curves would be :
   (A) Positively sloping straight lines
   (B) Negatively sloping curves
   (C) Negatively sloping straight lines
   (D) L shaped straight lines

33. जर तटस्थता वक्र धन उताराचा असेल तर तुम्ही कोणते विधान कराल ?
   (A) दोन्ही वस्तू वांछित वस्तू असतील
   (B) एक वस्तू वांछित व दुसरी अवांछित असेल
   (C) एक वस्तू तटस्थ असेल
   (D) दोन्ही अवांछित वस्तू असतील

34. जर दोन वस्तू एकमेकींना पूर्णपणे पूरक असतील तर त्यानुसार तटस्थता वक्र ........................ असेल.
   (A) धन उताराची सरळ रेषा
   (B) ऋण उताराचा वक्र
   (C) ऋण उताराची सरळ रेषा
   (D) L आकाराची सरळ रेषा

35. Who were the main proponents of new welfare economics ?

(A) Hicks — Allen — Sen

(B) Allen — Scitovszky — Samuelson

(C) Hicks — Kaldor — Scitovszky

(D) Sen —Samuelson — Kaldor

36. Identify the *incorrect* statement :

(*i*) When TR is maximum, the corresponding MR is equal to zero

(*ii*) When TR is maximum, the corresponding Ed = 1

(*iii*) When TR is rising and positive, the Ed > 1

(*iv*) When TR is rising and positive, the Ed < 1

(A) (*iii*)

(B) (*iv*)

(C) (*ii*)

(D) (*i*)

35. नव्या कल्याणाच्या अर्थशास्त्राचे प्रमुख पुरस्कर्ते कोण होते ?

(A) हिक्स – ॲलन – सेन

(B) ॲलन – सिटोव्हस्की – सॅम्युअलसन

(C) हिक्स – कॅलडोर – सिटोव्हस्की

(D) सेन – सॅम्युअलसन – कॅलडोर

36. पुढीलपैकी **चुकीचे** विधान ओळखा :

(*i*) जेव्हा एप्रा सर्वोच्च असते तेव्हा तदनुषंगिक सांप्रा शून्य असते

(*ii*) जेव्हा एप्रा सर्वोच्च असते तेव्हा तदनुषंगिक मागणी लवचिकता = 1 असते

(*iii*) जेव्हा एप्रा धन व वाढत असते तेव्हा मागणी लवचिकता > 1 असते

(*iv*) जेव्हा एप्रा धन व वाढत असते तेव्हा मागणी लवचिकता < 1 असते

(A) (*iii*)

(B) (*iv*)

(C) (*ii*)

(D) (*i*)

37. What can you say about these statements ?
    (*i*) All Giffen goods are inferior goods.
    (*ii*) All inferior goods are Giffen goods.
    (A) Both statement (*i*) and statement (*ii*) are incorrect
    (B) Statement (*i*) is correct and statement (*ii*) is incorrect
    (C) Statement (*i*) is incorrect and statement (*ii*) is correct
    (D) Both statement (*i*) and statement (*ii*) are correct

38. In the growth literature sigma convergence refers to :
    (A) Poor economies grow faster than rich economies
    (B) Reduction in the dispersion of income levels across countries
    (C) Increase in the dispersion of income levels across countries
    (D) Rich economies grow faster than poor economies

39. Ratchet effect relates to :
    (A) Life-cycle hypothesis
    (B) Permanent income hypothesis
    (C) Relative income hypothesis
    (D) Absolute income hypothesis

37. खालील विधानांबाबत तुम्ही काय सांगाल ?
    (*i*) सर्व गिफेन वस्तू या निकृष्ट वस्तू असतात.
    (*ii*) सर्व निकृष्ट वस्तू या गिफेन वस्तू असतात.
    (A) विधान (*i*) व विधान (*ii*) ही दोन्ही चूक आहेत
    (B) विधान (*i*) बरोबर व विधान (*ii*) चूक आहे
    (C) विधान (*i*) चूक व विधान (*ii*) बरोबर आहे
    (D) विधान (*i*) व विधान (*ii*) ही दोन्ही बरोबर आहेत

38. अभिवृद्धि साहित्यात सिग्मा अभिसरणाचा संदर्भ खालीलपैकी कशाशी असतो ?
    (A) गरीब अर्थव्यवस्था श्रीमंत अर्थव्यवस्थेपेक्षा अधिक जोमाने विकसित होतात
    (B) सर्वंकष राष्ट्राच्या उत्पन्न स्तरातील अपस्करणात घट होते
    (C) सर्वंकष राष्ट्राच्या उत्पन्न स्तरातील अपस्करणात वाढ होते
    (D) श्रीमंत अर्थव्यवस्था गरीब अर्थव्यवस्थांपेक्षा अधिक जोमाने विकसित होतात

39. अनिवर्ती परिणाम खालीलपैकी कशाशी संबंधित आहे ?
    (A) जीवनचक्र परिकल्पना
    (B) स्थायी आय परिकल्पना
    (C) सापेक्ष उत्पन्नानुसारी परिकल्पना
    (D) निरपेक्ष उत्पन्न परिकल्पना

40. In permanent income hypothesis, transitional income has :

(A) Positive and high correlation with permanent income

(B) Positive and low correlation with permanent income

(C) Zero correlation with permanent income

(D) Negative and high correlation with permanent income

41. Match the following :

**Statement I**

(*a*) Inventory approach to money demand

(*b*) Adaptive expectation

(*c*) Lower turning point

(*d*) Life-cycle hypothesis

**Statement II**

(*i*) Edmund Felds

(*ii*) John Hicks

(*iii*) Franco Modigliani

(*iv*) William Baumol

*Codes* :

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |
| (B) | (*iv*) | (*i*) | (*ii*) | (*iii*) |
| (C) | (*ii*) | (*i*) | (*iii*) | (*iv*) |
| (D) | (*ii*) | (*i*) | (*iv*) | (*iii*) |

40. स्थायी आय परिकल्पनेत संक्रमणकालीन उत्पन्न खालीलपैकी कसे राहील ?

(A) स्थायी आय बरोबरचे सहसंबंध गुणांक धनात्मक आणि उच्च

(B) स्थायी आय बरोबरील सहसंबंध गुणांक निम्न

(C) स्थायी आय बरोबरील सहसंबंधाचे गुणांक मूल्य शून्य

(D) स्थायी आय बरोबर सहसंबंध गुणकाचे मूल्य ऋणात्मक आणि उच्च

41. जोड्या जुळवा :

**विधान I**

(*a*) पैशाच्या मागणीचा साठा दृष्टिकोन

(*b*) अनुकूलक अंदाज

(*c*) खालचा वळण बिंदू

(*d*) जीवन-चक्र परिकल्पना

**विधान II**

(*i*) एडमंड फेल्ड्स

(*ii*) जॉन हिक्स

(*iii*) फ्रँको मोडीग्लिआनी

(*iv*) विलियम बॉउमॉल

**सांकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |
| (B) | (*iv*) | (*i*) | (*ii*) | (*iii*) |
| (C) | (*ii*) | (*i*) | (*iii*) | (*iv*) |
| (D) | (*ii*) | (*i*) | (*iv*) | (*iii*) |

42. Select the right answer from the options A to D given below :

**Assertion (S) :**

Long-run Phillips curve shows no trade-off between inflation and unemployment.

**Reasoning (R) :**

This is because individuals have rational expectations regarding future inflation.

(A) (S) is correct and (R) is correct

(B) (S) is correct and (R) is incorrect

(C) (S) is incorrect and (R) is correct

(D) (S) is incorrect and (R) is incorrect

43. According to Cambridge version of demand for money, velocity of money circulation will be constant if :

(A) Money supply and nominal income change in equal proportion

(B) Money supply increases at a higher rate than nominal income

(C) Money supply increases at a lower rate than nominal income

(D) Money supply has no relation with nominal income

42. खालीलपैकी A ते D पर्यायांमधून योग्य उत्तर निवडा :

**प्रतिपादन (S) :**

दीर्घकालीन फिलिप्स वक्र मुद्रास्फिती आणि बेरोजगार यांत सममूल्य नसल्याचे दर्शविते.

**युक्तिवाद (R) :**

याचे कारण भावी मुद्रास्फितीबाबत व्यक्ती विवेकी अंदाज बांधत असतात.

(A) (S) बरोबर आणि (R) बरोबर

(B) (S) बरोबर आणि (R) चूक

(C) (S) चूक आणि (R) बरोबर

(D) (S) चूक आणि (R) चूक

43. पैशासाठी मागणीच्या केंब्रीज आशयानुसार चलनातील पैशाचा प्रवेग स्थिर राहील जर :

(A) पैशाचा पुरवठा आणि नामित उत्पन्न यातील बदल समप्रमाणात झाले तर

(B) पैशाच्या पुरवठ्यातील वाढ नामित उत्पन्नापेक्षा अधिक जास्त दराने झाल्यास

(C) पैशाच्या पुरवठ्यातील वाढ नामित उत्पन्नापेक्षा अल्प दराने झाल्यास

(D) पैशाचा पुरवठा आणि नामित उत्पन्न यात संबंध नसल्यास

44. Which one of the following is *not* part of the classical approach to determination of output and employment ?
  (A) Say's law
  (B) Wage-price flexibility
  (C) Savings-Investment equality
  (D) Money wage rigidity

45. When the population growth rate of an economy becomes greater than the achievable economic growth rate, it is known as ..................... .
  (A) Population Explosion
  (B) Population Trap
  (C) Population Crisis
  (D) Population Cross

46. Make a choice of the correct sequence given by Karl Marx for development of society :
  (A) Primitive communalism, Feudalism, Capitalism, Socialism, Communism
  (B) Primitive communalism, Feudalism, Socialism, Communism, Capitalism
  (C) Feudalism, Primitive communalism, Socialism, Capitalism, Communism
  (D) Communism, Capitalism, Socialism, Feudalism, Primitive communalism

44. उत्पादन आणि रोजगार निर्धारणाच्या अभिमत दृष्टिकोनात खालीलपैकी कुठला भाग समाविष्ट होत **नाही** ?
  (A) 'से' चा नियम
  (B) वेतन-किंमत लवचिकता
  (C) बचत-गुंतवणूक समानता
  (D) पैशातील वेतनदृढता

45. जेव्हा अर्थव्यवस्थेतील लोकसंख्या वृद्धीदर हा उपलब्ध आर्थिक वृद्धीदरापेक्षा जास्त असतो, तेव्हा त्यांस .................... असे संबोधिले जाते.
  (A) लोकसंख्या विस्फोट
  (B) लोकसंख्या सापळा
  (C) लोकसंख्या अरिष्ट
  (D) लोकसंख्या छेदन

46. कार्ल मार्क्स यांनी सांगितलेल्या समाजविकासाच्या अवस्थांच्या संदर्भात अचूक क्रम सांगा :
  (A) प्राचीन जातीयवाद, सरंजामशाही, भांडवलशाही, समाजवाद, साम्यवाद
  (B) प्राचीन जातीयवाद, सरंजामशाही, समाजवाद, साम्यवाद, भांडवलशाही
  (C) सरंजामशाही, प्राचीन जातीयवाद, समाजवाद, भांडवलशाही, साम्यवाद
  (D) साम्यवाद, भांडवलशाही, समाजवाद, सरंजामशाही, प्राचीन जातीयवाद

47. The theory of "Big Push" is propounded by ........................ .
   (A) Arthur Lewis
   (B) C. P. Kindelberger
   (C) Rosenstein Rodan
   (D) Karl Marx

48. Which one of the following is important aspects of the concept of sustainable development ?
   (A) Intragenerational equity and intergenerational equity
   (B) Intergenerational equity and intragenerational inequity
   (C) Intragenerational inequity and intergenerational inequity
   (D) Intergenerational inequity and intragenerational equity

49. Which one of the following is better measure of degree of income inequality ?
   (A) Kuznet Hypothesis
   (B) Gini Coefficient
   (C) Poverty Line
   (D) Lorenz Curve

47. 'प्रबळ चालना' सिद्धांत ..................... यांनी प्रस्तुत केला आहे.
   (A) आर्थर लेविस
   (B) सी. पी. किंडेलबर्गर
   (C) रोझेस्टिन रोडान
   (D) कार्ल मार्क्स

48. शाश्वत विकास संकल्पनेचे खालीलपैकी कोणता एक महत्त्वपूर्ण पैलू आहे ?
   (A) पिढ्यांतर्गत न्याय आणि आंतरपिढ्यांमधील न्याय
   (B) आंतरपिढ्यांमधील न्याय आणि पिढ्यांतर्गत अन्याय
   (C) पिढ्यांतर्गत अन्याय आणि आंतरपिढ्यांमधील अन्याय
   (D) आंतरपिढ्यांमधील अन्याय आणि पिढ्यांतर्गत न्याय

49. उत्पन्न विषमता दराच्या मापनाचे खालीलपैकी कोणते एक उत्तम साधन आहे ?
   (A) कुझनेट गृहीतक
   (B) गिनी गुणांक
   (C) दारिद्र्य रेषा
   (D) लॉरेंझ वक्र

50. Match the following :

**Investment Criteria**

(*a*) Capital turnover ratio

(*b*) Social marginal productivity

(*c*) Reinvestment criterion

(*d*) Time series criterion

**Economists**

(*i*) Dr. A. K. Sen

(*ii*) Galenson and Leibenstein

(*iii*) A. E. Kahn and H. B. Chenery

(*iv*) J. J. Polak and N. S. Buchanan

*Codes* :

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*ii*) | (*i*) | (*iv*) | (*iii*) |
| (B) | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |
| (C) | (*iii*) | (*iv*) | (*i*) | (*ii*) |
| (D) | (*iv*) | (*iii*) | (*ii*) | (*i*) |

50. जोड्या लावा :

**गुंतवणूक निकष**

(*a*) भांडवल उलाढाल गुणोत्तर

(*b*) सामाजिक सीमांत उत्पादकता

(*c*) पुनर्गुंतवणूक निकष

(*d*) काल शृंखला निकष

**अर्थतज्ञ**

(*i*) डॉ. ए. के. सेन

(*ii*) गॅलेन्सन व लिबिनस्टिन

(*iii*) ए. ई. काहन व एच. बी. चेनेरी

(*iv*) जे. जे. पोलाक व एन. एस. बुचानन

**सांकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*ii*) | (*i*) | (*iv*) | (*iii*) |
| (B) | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |
| (C) | (*iii*) | (*iv*) | (*i*) | (*ii*) |
| (D) | (*iv*) | (*iii*) | (*ii*) | (*i*) |

## ROUGH WORK